ESTD 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
With CGPA 3.52

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

परिपत्रक

विषय : दिपावली/ईद सण अग्रीमाबाबत..

विद्यापीठातील शासन मान्य पदावरील व विद्यापीठ निधीवरील नियमित अधिकारी व सेवकांना आदेशान्वये कळविण्यात येते की, प्रतिवर्षी विद्यापीठ सेवेत कायमस्वरुपी असणाऱ्या प्रशासकीय सेवकांना दिपावली / ईद या सणासाठी अग्रीम स्वरूपात रक्कम देण्यात येते. व्यवस्थापन परिषदेचा दि. 28/10/2026 रोजीच्या ठरावानुसार दिपावली / ईद सणासाठी रू. 10,000/–, रु. 15,000/–, रु. 20,000/– व रू. 25,000 या प्रमाणे कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार अग्रीम रक्कम देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

जे प्रशासकीय अधिकारी/सेवक/तांत्रिक सेवक दिपावली / ईद सणासाठी अग्रीम घेण्यासाठी इच्छुक आहेत, त्या सर्व सेवकांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या **Employee Corner** येथून संगणक प्रणालीद्वारे **Online** अर्ज भरावेत. संगणक प्रणालीमध्ये अर्ज सादर करताना **अग्रीम रक्कम रू. 10,000/– , रु. 15,000/–, रु. 20,000/– व रू. 25,000 ची मागणी नोंदवावी. तसेच अर्जामध्ये युको बॅंकचा संपूर्ण बचत खाते कमांक, Employee Code Number** बिनचूक टाकावा. अर्ज करतेवेळी अग्रीम मागणीची **रक्कम व्यक्तीशः पडताळणी करूनच नोंदवावी. एकदा नोंदविलेल्या अग्रीम रक्कमेध्ये बदल करता येणार नाही.**

सदर अर्जाची हार्ड कॉपी एक रुपयाचा रेव्हेन्यू स्टॅम्प लावून स्वाक्षरीसहीत पगारपत्रके विभागात दिनांक **03 नोव्हेंबर 2026** रोजी सायंकाळी 5:00 वाजेपर्यंत सादर करावी. सदरचा Online अर्ज भरणे अनिवार्य असून मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

(डॉ. ~~श्रीमती~~ एस. एस. पाटील)
वित्त व लेखाधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संदर्भ क्र. शिवाजी वि./लेखा/पगारपत्रके / 366
दिनांक : 31 OCT 2026

प्रति :– माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

1) सर्व अधिविभाग/प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणावे. तसेच आपल्या विभागामध्ये वर्ग 04 मधील सेवकांना सदरचा अर्ज भरून देणेबाबत सहकार्य करावे.
2) मा.कुलगुरू/ मा. प्र–कुलगुरू/मा.कुलसचिव/ मा. अधिष्ठाता/ मा.संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ/ मा.वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालयास.
3) इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

दिपावली अग्रीमसाठी अटी/शर्ती खालील प्रमाणे आहेत.

1. नियमित सेवेत असलेल्या पूर्णवेळ सर्व प्रशासकीय अधिकारी व सेवकांना त्यांचे मागणीनुसार रू.10000/–, रु.15000/– , रु. 20000/– व रु. 25000/– इतका अग्रीम मंजूर कराता येईल.
2. अग्रीम रक्कम दिला जाणाऱ्या महिन्यापासून ज्या नियीमत अधिकारी व सेवकांची एकूण सलग सेवा तेरा महिन्यांपेक्षा कमी कालावधीची राहिली आहे त्यांना अग्रीम देय नाही.
3. दिलेली अग्रीम रक्कम समान दहा मासिक हप्त्यात पगारातून कपात करण्यात येईल.
4. अग्रीम परतफेडीचा हप्ता दिपावली सणाच्या पुढील महिन्यापासून घेतला जाईल.
5. अग्रीम स्वीकारणाऱ्या अधिकारी व सेवकांने सेवेचा राजीनामा दिल्यास अथवा त्याच्या इतर कारणांमुळे सेवा समाप्ती इ. गोष्टी घडल्यास सण अग्रीम रक्कम एक रक्कमी कार्यालयास जमा करण्याबाबत लेखी हमीपत्र देणे आवश्यक राहील. तसेच मिळणाऱ्या मासिक वेतन व इतर मिळणाऱ्या रक्कमेमधून उरलेली अग्रीम रक्कम वसुल करण्याबाबतचा अधिकार कार्यालयास राहील.
6. सण अग्रीम वर्षातून एकच वेळेस दिला जाईल.
7. ज्या सेवकांची मागील अग्रीम वसुली झालेली नाही अशा सेवकांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
8. ऑनलाईन अर्जास 01 रुपयाचा रेव्हेन्यू स्टॅम्प लावून स्वाक्षरीसहीत प्रत पगारपत्रके विभागात विहीत मुदतीत जमा करणे अनिवार्य आहे.
9. अग्रीम फॉर्म संगणक प्रणालीद्वारे ॲटो जनरेट होत असलेने जो संगणक प्रणालीव्दारे फॉर्म भरण्यात आलेला आहे तोच ग्राहय धरण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.
10. अग्रीम रक्कम कालावधी पुर्ण होण्यापुर्वी कार्यालयास मध्यावधीत भरणा करता येणार नाही. अग्रीम रक्कम विहित कालावधीमध्येच प्रति महा वेतनातून कपात करण्यात येईल.

D:\1PRITHVEE\FASTIVAL ADV\New folder\CIRCULAR.docx